(७५३)

<u>गोपनीय</u>

एकाच प्रकरणी न्यायिक कारवाई व विभागीय चौकशी एकाच वेळी सुरू असताना, विभागीय चौकशीतील दोषसिध्दीच्या आधारे द्यावयाच्या. <u>निर्णयाबाबत.</u>

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक डीईएन-२५९०/सीआर-१८४/२०,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक :- 28 MAY 1991

SO File: Departmental Enquiries

3354
12-6-91

## <u>परिपत्रक</u>

जिल्हा परिषद कर्मचा-याने केलेल्या अपहाराबद्दल/अफरातफरीबद्दल जिल्हा परिषदेत त्या कर्मचा-याविरुध्द विभागीय चौकशी नियमावलीतील परिच्छेद ४.२ नुसार न्यायिक कारवाई व विभागीय चौकशी एकाच वेळी सुरु करता येते. न्यायालयीन कारवाई प्रगत असताना व ती पूर्ण झाल्याशिवाय विभागीय चौकशीतील निष्कर्षाप्रमाणे अपचा-यास शिक्षा प्रदान करता येत नाही, असा अर्थ या नियमाचा लावण्यात येतो.

तथापि, आता असे स्पष्ट करण्यात येते की, विभागीय चौकशी नियमावलीतील परिच्छेद ४.२ नुसार न्यायालयीन कारवाई प्रगत असताना विभागीय चौकशीतील निष्कर्षाप्रमाणे महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा [शिस्त व अपील] नियम, १९६४ मधील नियम ४ च्या खंड [पाच] [सहा] [सात] याबाबतची जबर शिक्षा लावण्याच्या निर्णयाप्रत शिस्तभंगविषयक प्राधिकरण आले असेल, तर अपचा-याला ती शिक्षा देता येईल. तसेच सौम्य शिक्षा द्यावयाच्या निर्णयाप्रत शिस्तभंगविषयक प्राधिकरण आले असेल, तरी त्याप्रमाणे शिक्षा देता येईल. तथापि, शिस्तभंगविषयक प्राधिकरणाने सौम्य शिक्षा दिल्यानंतर, जर अपचारी न्यायालयीन कार्यवाहीमध्ये दोषी ठरला व त्यानुसार जबर शिक्षेस पात्र ठरत असेल, तर अपचा-याला पुन्हा शिक्षा देता येणार नाही. आणि म्हणूनच सौम्य शिक्षा द्यावयाची झाल्यास न्यायनिर्णयाची वाट पहाणे योग्य ठरेल.

3622
19/6

शासन आता अशा सूचना देत आहे की, जिल्हा परिषद कर्मचा-यांच्या अपहार/अफरातफर प्रकरणी न्यायिक कारवाई व विभागीय चौकशी एकाच वेळी सुरु असेल आणि विभागीय चौकशीच्या निष्कर्षाप्रमाणे जिल्हा परिषद जबर शिक्षा देण्याच्या निर्णयाप्रत आली असेल, तर न्यायनिर्णयाची वाट न पहाता शिक्षेचे आदेश निर्गमित करण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ कि. मि. जोशी ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व सहाय्यक, आयुक्त [विकास], विभागीय आयुक्तांचे कार्यालय,
निवड नस्ती.

Scanned by CamScanner